ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, ७ ऑगस्ट, १९६३ | अंक १५



अधिक झाडे लावा

मातोश्री जिजामातेची पुण्यतिथी ता. १७ जून ते
महात्मा गांधींचा जन्मदिन ता. २ ऑक्टोबर
१९६३ पर्यंत, चार कोटी झाडे लावण्याचा
महाराष्ट्राचा संकल्प पुरा करा
झाडांची जोपासना करून उत्तम वनराजी
वाढीस लावल्याने राष्ट्राच्या संपत्तीत
भर पडते



प्रत्येकाने एक तरी झाड लावावे व त्याची जोपासना करावी

अधिक धान्य पिकवू, अधिक गवत उगवू,
अधिक भाजीपाला पिकवू हाच आमचा निर्धार

प्रसिद्धि संचालक महाराष्ट्र शासन

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार, ७ ऑगस्ट, १९६३ अंक १५



अधिक झाडे लावा

मातोश्री जिजामातेची पुण्यतिथी ता. १७ जून ते
महात्मा गांधींचा जन्मदिन ता. २ ऑक्टोबर
१९६३ पर्यंत, चार कोटी झाडे लावण्याचा,
महाराष्ट्राचा संकल्प पुरा करा
झाडांची जोपासना करून उत्तम वनराजी
वाढीस लावल्याने राष्ट्राच्या संपत्तीत
भर पडते



प्रत्येकाने एक तरी झाड लावावे व त्याची जोपासना करावी

अधिक धान्य पिकवू, अधिक गवत उगवू,
अधिक भाजीपाला पिकवू हाच आमचा निर्धार

प्रसिद्धि संचालक महाराष्ट्र शासन

## चार कोटी झाडें लावण्याचा संकल्प

### मुख्यमंत्र्यांचें आवाहन

हा १४ वा वनमहोत्सव. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४८ सालापासून झाडें लावण्याचा उपक्रम सालोसाल आपण करीत आहोंत. एक आठवडाभर हा वृक्षारोपण सप्ताह होत आला; परंतु यावेळच्या वृक्षारोपणमोहिमेचें वैशिष्ट्य हें आहे कीं, सबंध पावसाळाभर, साडेतीन महिने ही मोहीम चालू ठेवावयाची आहे.

महाराष्ट्रांत या वृक्षारोपण मोहिमेंत १ कोटि झाडें लावण्यांत यावींत, असें तारीख १४ मे रोजीं जाहीर करण्यांत आलें होतें. परंतु त्यानंतर ठिकठिकाणीं या वृक्षारोपण मोहिमेबाबत जो उत्साह दिसून आला त्यावरून १ कोटीवरून चार कोटीपर्यंतचा झाडें लावण्याचा हा आकडा वाढविण्यांत आला आहे.

चार कोटि झाडांपैकी जंगलखात्याकडून अर्धी झाडें लावलीं जातील व जिल्हा परिषदांच्या मार्फत अर्धी झाडें लावलीं जातील. चार कोटि झाडांपैकी एक कोटि तरी झाडें फळझाडांचीं राहातील. सर्वांनीं हातभार लावल्यास व सामुदायिक रीत्या जनशक्ति संघटित झाल्यास चार कोटि झाडांपेक्षा कितीतरी अधिक झाडें लावतां येणें शक्य आहे.

महाराष्ट्रांतील ३५,५२६ खेड्यांनीं, २७३ शहरांनीं, १९,६८९ ग्रामपंचायतींनीं ५५,०६१ सहकारी संस्थांनीं ३४,०७४ प्राथमिक शाळा, मिडल स्कूल्स, हायस्कूल्स, कॉलेजेस आणि कारखान्यांनीं कसोशीनें प्रयत्न केल्यास ही वृक्षारोपणाची मोहीम अपेक्षेबाहेर यशस्वी झाल्यावांचून राहाणार नाहीं. सर्व प्रकारच्या सार्वजनिक संस्थांनीं व कार्यकर्त्यांनीं "आधीं केलें मग सांगितलें" या समर्थ-वचनानुसार प्रथम स्वतः जागोजाग झाडें लावावयाला लागून जनतेंत या वृक्षारोपण मोहिमेचा चिकाटीनें प्रचार करावा.

---

## इंडस्ट्रिअल मार्च, १९६३*

किर्लोस्कर प्रेसच्या ह्या वार्षिक प्रकाशनाचा १९६३ चा अंक नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. भारताच्या औद्योगिक प्रगतीचा आढावा घेणारे व त्या संबंधांतील प्रश्नांची, अडीअडचणींची चर्चा करणारे अनेक तज्ज्ञांचे लेख त्यांत समाविष्ट आहेत. औद्योगिक प्रगतीकडे फक्त उद्योगपतीच्या दृष्टीनेंच पहाण्यांत आले नसून, सर्व बाजूंनीं त्याविषयीं विचार करण्यांत आलेला दिसून येतो. उदाहरणार्थ, प्राध्यापक पटवर्धन ह्यांनीं नव्या करवाढीचें समर्थन केलें आहे, तें प्रचलित वातावरणांत धाडसाचेंच म्हटलें पाहिजे. देशाच्या संरक्षणासाठी इतका पैसा पाहिजे हें निश्चित झाल्यावर तो कसा उभारावयाचा, एवढाच प्रश्न शिल्लक राहातो, आणि ही करवाढ नको म्हणून पुरत नाहीं; दुसरे मार्ग दाखवावे लागतात. अप्रत्यक्ष करांऐवजीं दुसरे कोणते कर बसविल्यानें करांचें उत्पन्न कमी न होता करवाढ अधिक न्यायाची होईल हें सांगतां यावें लागतें. अर्थात् जनतेच्या त्यागाला साजेशी सरकारची काटकसर आणि कार्यक्षमताहि हवी, हें ह्या पटवर्धन ह्यांनीं स्पष्ट केलें आहे. इंडस्ट्रिअल मार्चमधील ह्या लेखाचा मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण, संपादकांच्या व्यापक दृष्टीकोणाकडे लक्ष वेधणें हा आहे "अपेक्षे-प्रमाणें शेती, कारखाने व कोळसा ह्यांचें उत्पादन वाढलें असतें तर वहातुकीची व्यवस्था कोसळलीच असती" असें संपादकांनीं म्हटलें आहे, तें आपल्या सध्यांच्या परिस्थितीच्या तीव्रतेचें निदर्शक आहे. "इंडस्ट्रिअल मार्च" चें विशाल दृष्टिकोण हें वैशिष्ट्य आहे; केवळ वैयक्तिक उद्योगधंद्यांपुरतें आणि धनिकापुरतें न पहतां देशाच्या व्यापक हिताकडे पहाणें त्यामुळें त्याला शक्य आहे. ही कामगिरी त्यानें उत्कृष्ट रीतीनें पार पाडली आहे.

* पृ. सं. १३० किं. रु. ३=०० संपादक मु. शं. किर्लोस्कर.

**प्रदर्शनांत हिंदी संगीत**—मॉस्कोमध्यें उघडण्यांत आलेल्या हिंदी प्रदर्शनांत रशियन प्रेक्षकांना रिझविण्यासाठीं हिंदी संगीत ऐकविण्याची खास व्यवस्था करण्यांत आली आहे. प्रदर्शनांत हिंदी उद्योगधंद्यांची प्रगति दाखविणारीं भिंती चित्रें रंगविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकी एक चित्र तर ७० फूट लांब आणि ३५ फूट उंच आहे. केरळमधील एका सहकारी संस्थेनें राज्यांतील केळीं व अननस पाठविण्याची सोय केली आहे.

**जागतिक सुंदरीची निवड**—अमेरिकेंत भरविण्यांत आलेल्या जागतिक सुंदरींच्या स्पर्धेत ब्राझिलमधील एका कॉलेजतरुणीची जागतिक सुंदरी म्हणून निवड करण्यांत आली आहे. सौंदर्य-सम्राज्ञीचा मान पटकावण्याच्या अंतिम फेरींत १५ तरुणींना पाचारण करण्यांत आलें होतें. ह्या ब्राझिलिअन तरुणीला आतां जगाचा प्रवास करण्यास मिळेल. त्याशिवाय १७,५०० डॉलर्सचीं बक्षिसें तिला मिळालीं आहेत.

**टेलेस्टारचें दळणवळण तुटलें**—अंतरिक्षांतून दळणवळण करण्यासाठी अमेरिकेनें ता. ७ मे रोजीं टेलेस्टार नं. २ पृथ्वीभोंवतीं प्रदक्षिणा करण्यास धाडला होता. ह्या उपग्रहाच्या ४५० फेऱ्या झाल्यावर तो पृथ्वीवरून पाठविण्यांत आलेल्या संदेशाला साद देईनासा झाला आहे. वॉशिंग्टनमधील गोटांत अशा अफवा पसरल्या आहेत कीं रशियांतून प्रक्षेपित करण्यांत आलेल्या हुकमानें टेलेस्टार काम करीनासा झाला आहे. त्याला पुन्हा कार्य-क्षम करण्याचे प्रयत्न सफल झालेले नाहींत. तो तयार करणाऱ्या अमेरिकन कंपनीनें कोणाकडूनहि हस्तक्षेप झालेला नसल्याचें जाहीर केलें आहे.

---


बचत करणें
म्हणजेच
यशस्वी होणें

| | | | |
|---|---|---|---|
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ३६महिने द्या. | रु. ३६०.०० | रु. ३८२.०० | तुम्ही ३७ व्या महिनाअखेर मिळवा. |
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ४८महिने द्या. | रु. ४८०.०० | रु. ५२१.५० | तुम्हीं ४९ व्या महिनाअखेर मिळवा. |
| तुम्हीं दरमहा रु. १०/- ६०महिने द्या. | रु. ६००.०० | रु. ६६८.५० | तुम्हीं ६१ व्या महिनाअखेर मिळवा. |

आमचेकडे
क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातें उघडा
दि बेळगांव बँक लिमिटेड
( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

# अर्थ

बुधवार, ७ ऑगस्ट, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी परदेशीय मदत

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षासाठी भारत-मित्र-मंडळाकडून आवश्यक ती मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत; परंतु मंडळाकडून मिळणारी मदत जरूरीपेक्षा बरीच कमी पडण्याची शक्यता आहे. भारताची मंडळाकडून १२५ कोटी डॉलर्स मिळावे अशी अपेक्षा आहे. मंडळाकडून मिळू शकणाऱ्या मदतीचा आंकडा १०० कोटींच्या पुढें जाण्याची शक्यता मात्र दिसत नाहीं. भारताला आपली संरक्षणव्यवस्था अधिक मजबूत करावयाची असल्यानें परदेशीय चलनाची गरज अधिकच वाढलेली आहे. त्यामुळें पंचवार्षिक कार्यक्रमांतील कांहीं महत्त्वाच्या विकासाच्या योजना संथ गतीनें पार पाडाव्या लागण्याचा संभव आहे. गेल्या तीन वर्षांत मित्रमंडळाकडून भारताला मिळणाऱ्या मदतींत कपात होत आलेली आहे. १९६१ सालीं एकूण १२९·५ कोटी डॉलर्सची मदत देण्यांत आलेली होती. गेल्या वर्षी मदतीचा आकडा १०३ कोटी डॉलर्सपर्यंत खाली घसरला. ब्रिटननें आपल्या मदतीचा ओघ कमी केलेला नाहीं. १९६२ सालीं ब्रिटनकडून ८·४ कोटी डॉलर्स मिळाले होते. १९६३ सालींहि तितक्याच प्रमाणांत मदत मिळत राहिली आहे. पश्चिम जर्मनीकडून मिळणाऱ्या मदतींत मात्र बरीच घट झालेली आहे. १९६२ सालीं पश्चिम जर्मनीनें १३·९ कोटी डॉलर्स मदतीदाखल दिले होते. चालू वर्षी मात्र त्या देशाकडून ६·५ कोटी डॉलर्सच मिळाले आहेत. फ्रान्स व इटली ह्या देशांकडून मिळणाऱ्या मदतींतहि घट झालेली आहे. अमेरिकेनें १९६२ सालीं ४३·५ कोटी डॉलर्सची रक्कम दिली होती. चालू वर्षी मात्र अमेरिकेनें ३७·५ कोटी डॉलर्सच देऊं केलें आहेत. जपान व जागतिक बँक ह्यांच्याकडून चालू वर्षासाठी मिळणाऱ्या मदतींत वाढ झाली आहे. संरक्षणव्यवस्थेसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाच्या खर्चांत वाढ झालेली आहे.

---

## शेतीच्या अवजारांसाठी पोलादाचा अपुरा पुरवठा

भारतासारख्या शेतीप्रधान देशाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १५ वर्षांनंतरहि अन्नधान्याची आयात करावी लागते ह्याबद्दल पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांनीं अलीकडेच जाहीररीत्या खेद व्यक्त केला होता. आधुनिक पद्धतीनें शेती करण्याचें आवाहनहि ते शेतकऱ्यांना उद्देशून अधूनमधून करीत असतात. शेतीची पद्धत सुधारण्याच्या कामीं इतर अनेक बाबींबरोबरच सुधारलेल्या शेतीच्या अवजारांनाहि महत्त्व आहे. परंतु गेल्या दोनतीन वर्षांत शेतीच्या अवजारांसाठी लागणारें पोलाद पुरेशा प्रमाणांत मिळेनासें झालें आहे. १९५७-५८ सालापासून अवजारांसाठी लागणाऱ्या पोलादाची मागणी वाढत चाललेली आहे. त्या वर्षी शेतीच्या यंत्रांसाठी ३,९१,४८१ टन पोलादाची मागणी करण्यांत आली होती. पण फक्त ९१,९८३ टन पोलादच मंजूर करण्यांत आलें. १९५९ सालीं ४,२४,२९८ टन पोलादाची मागणी करण्यांत आली. मंजुरी मात्र १,१४,८५० टनांचीच देण्यांत आली. १९६० सालीं ४ लाख टन पोलादाची मागणी करण्यांत आली असतांना ३,९०,४०० टन पोलादच मंजूर करण्यांत आलें. पोलादाच्या ह्या अपुऱ्या पुरवठ्याबद्दल जवळजवळ सर्व राज्यांनीं तक्रारी केल्या आहेत. शेतीच्या अवजारांसाठी मिळणारा पोलादाचा पुरवठा त्याच कामासाठी वापरला जातो कीं नाहीं, ह्यावर नजर ठेवण्यासाठीं राज्य सरकारांच्या शेतकीखात्यानें अधिकाऱ्यांच्या नेमणुकाहि केलेल्या आहेत. राज्यांना मंजूर करण्यांत येणारा पोलादाचा पुरवठा अपुरा तर आहेच; पण तोहि मिळण्यांत विलंब होतो. शिवाय निरनिराळ्या प्रकारांचीं अवजारें करण्यास लागणारें विशेष प्रकारचें पोलादहि मिळत नाहीं, अशी राज्य सरकारांची तक्रार आहे. सध्यां शेतीच्या अवजारांसाठी लागणारें विशेष प्रकारचें पोलाद टाटा कंपनीच तयार करूं शकते.

---

## स्वस्त पाठ्यपुस्तकांची प्रकाशकांना भीति

विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारीं पाठ्यपुस्तकें स्वस्त मिळावींत ह्याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. पाठ्यपुस्तकें स्वस्त मिळालीं तर विद्यार्थ्यांवरील आर्थिक ताण अर्थातच कांहीं प्रमाणांत कमी होईल. परंतु कलकत्त्याच्या पाठ्यपुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकांना स्वस्त पाठ्यपुस्तकांची भीति वाटूं लागली आहे. कांहीं परदेशीय प्रकाशक विद्यापीठांतर्गत अभ्यासासाठी लागणारीं पाठ्यपुस्तकें अतिशय अल्प किंमतींना पुस्तकांच्या बाजारांत विकूं लागले आहेत. त्यामुळें स्थानिक प्रकाशकांना आपला धंदा बसण्याची भीति वाटूं लागली आहे. दिल्ली येथें एका नव्या अमेरिकन प्रकाशक कंपनीनें स्वस्त पाठ्यपुस्तकांचें असेंच एक केंद्र उघडलें आहे. हिंदी विद्यार्थ्यांना जरूर तीं पाठ्यपुस्तकें स्वत: विकत घेतां यावींत म्हणून हें केंद्र स्थापन करण्यांत आलें असून त्याला अमेरिकन सरकारचाच नव्हे, तर भारत सरकारचाहि पाठिंबा आहे. हिंदी विद्यापीठांत ज्या अमेरिकन पाठ्यपुस्तकांची शिफारस करण्यांत आलेली आहे, अशा पुस्तकांचें खूप मोठ्या प्रमाणावर प्रकाशन करण्याचा केंद्राचा इरादा आहे. ह्या पाठ्यपुस्तकांच्या किंमती मूळच्या अमेरिकन पुस्तकांच्या किंमतीपेक्षा बऱ्याच कमी, म्हणजे एकतृतिआंशापेक्षा अगर त्याहीपेक्षा कमी ठेवण्यांत येणार आहेत. पाठ्यपुस्तकांत सर्व तांत्रिक विषयांवरील ताज्यांत ताजी पुस्तकें तर असतीलच; पण त्याशिवाय प्रत्येक विषयावर प्रमाण म्हणून मानलीं गेलेलींहि पुस्तकें असतील. एंजिनिअरिंगसारख्या विषयांवरील ज्या पाठ्यपुस्तकांची किंमत अमेरिकेंत ५० ते ६० रुपये आहे अशीं पुस्तकें भारतांत ९ ते १० रुपयांना देण्यांत येणार आहेत. आधुनिक प्राणिशास्त्रावरील पुस्तकांची मूळची किंमत ९ रुपये आहे. पण तीहि प्रत्येकी २ रुपयांना देण्यांत येणार आहेत.

---

# अर्थ

बुधवार, ७ ऑगस्ट, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी परदेशीय मदत

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षासाठी भारत-मित्र-मंडळाकडून आवश्यक ती मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत; परंतु मंडळाकडून मिळणारी मदत जरूरीपेक्षा बरीच कमी पडण्याची शक्यता आहे. भारताची मंडळाकडून १२५ कोटी डॉलर्स मिळावे अशी अपेक्षा आहे. मंडळाकडून मिळू शकणाऱ्या मदतीचा आंकडा १०० कोटींच्या पुढें जाण्याची शक्यता मात्र दिसत नाहीं. भारताला आपली संरक्षणव्यवस्था अधिक मजबूत करावयाची असल्यानें परदेशीय चलनाची गरज अधिकच वाढलेली आहे. त्यामुळें पंचवार्षिक कार्यक्रमांतील कांहीं महत्त्वाच्या विकासाच्या योजना संथ गतीनें पार पाडाव्या लागण्याचा संभव आहे. गेल्या तीन वर्षांत मित्रमंडळाकडून भारताला मिळणाऱ्या मदतींत कपात होत आलेली आहे. १९६१ सालीं एकूण १२९·५ कोटी डॉलर्सची मदत देण्यांत आलेली होती. गेल्या वर्षी मदतीचा आकडा १०३ कोटी डॉलर्सपर्यंत खाली घसरला. ब्रिटननें आपल्या मदतीचा ओघ कमी केलेला नाहीं. १९६२ सालीं ब्रिटनकडून ८·४ कोटी डॉलर्स मिळाले होते. १९६३ सालींहि तितक्याच प्रमाणांत मदत मिळत राहिली आहे. पश्चिम जर्मनीकडून मिळणाऱ्या मदतींत मात्र बरीच घट झालेली आहे. १९६२ सालीं पश्चिम जर्मनीनें १३·९ कोटी डॉलर्स मदतीदाखल दिले होते. चालू वर्षी मात्र त्या देशाकडून ६·५ कोटी डॉलर्सच मिळाले आहेत. फ्रान्स व इटली ह्या देशांकडून मिळणाऱ्या मदतींतहि घट झालेली आहे. अमेरिकेनें १९६२ सालीं ४३·५ कोटी डॉलर्सची रक्कम दिली होती. चालू वर्षी मात्र अमेरिकेनें ३७·५ कोटी डॉलर्सच देऊं केले आहेत. जपान व जागतिक बँक ह्यांच्याकडून चालू वर्षासाठी मिळणाऱ्या मदतींत वाढ झाली आहे. संरक्षणव्यवस्थेसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाच्या खर्चांत वाढ झालेली आहे.

---

## शेतीच्या अवजारांसाठी पोलादाचा अपुरा पुरवठा

भारतासारख्या शेतीप्रधान देशाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १५ वर्षांनंतरहि अन्नधान्यांची आयात करावी लागते ह्याबद्दल पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांनीं अलीकडेच जाहीररीत्या खेद व्यक्त केला होता. आधुनिक पद्धतीनें शेती करण्याचें आवाहनहि ते शेतकऱ्यांना उद्देशून अधूनमधून करीत असतात. शेतीची पद्धत सुधारण्याच्या कामीं इतर अनेक बाबींबरोबरच सुधारलेल्या शेतीच्या अवजारांनाहि महत्त्व आहे. परंतु गेल्या दोनतीन वर्षांत शेतीच्या अवजारांसाठी लागणारें पोलाद पुरेशा प्रमाणांत मिळेनासें झालें आहे. १९५७–५८ सालापासून अवजारांसाठी लागणाऱ्या पोलादाची मागणी वाढत चाललेली आहे. त्या वर्षी शेतीच्या यंत्रांसाठी ३,९१,४८१ टन पोलादाची मागणी करण्यांत आली होती. पण फक्त ९१,९८३ टन पोलादच मंजूर करण्यांत आलें. १९५९ सालीं ४,२४,२९८ टन पोलादाची मागणी करण्यांत आली. मंजुरी मात्र १,१४,८५० टनांचीच देण्यांत आली. १९६० सालीं ४ लाख टन पोलादाची मागणी करण्यांत आली असतांना ३,२०,४०० टन पोलादच मंजूर करण्यांत आलें. पोलादाच्या ह्या अपुऱ्या पुरवठ्याबद्दल जवळजवळ सर्व राज्यांनीं तक्रारी केल्या आहेत. शेतीच्या अवजारांसाठी मिळणारा पोलादाचा पुरवठा त्याच कामासाठी वापरला जातो कीं नाहीं, ह्यावर नजर ठेवण्यासाठी राज्य सरकारांच्या शेतकीखात्यानें अधिकाऱ्यांच्या नेमणुकाहि केलेल्या आहेत. राज्यांना मंजूर करण्यांत येणारा पोलादाचा पुरवठा अपुरा तर आहेच; पण तोहि मिळण्यांत विलंब होतो. शिवाय निरनिराळ्या प्रकारांचीं अवजारें करण्यास लागणारें विशेष प्रकारचें पोलादहि मिळत नाहीं, अशी राज्य सरकारांची तक्रार आहे. सध्यां शेतीच्या अवजारांसाठी लागणारें विशेष प्रकारचें पोलाद टाटा कंपनीच तयार करूं शकते.

---

## स्वस्त पाठ्यपुस्तकांची प्रकाशकांना भीति

विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारीं पाठ्यपुस्तकें स्वस्त मिळावींत ह्याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. पाठ्यपुस्तकें स्वस्त मिळालीं तर विद्यार्थ्यांवरील आर्थिक ताण अर्थातच कांहीं प्रमाणांत कमी होईल. परंतु कलकत्त्याच्या पाठ्यपुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकांना स्वस्त पाठ्यपुस्तकांची भीति वाटूं लागली आहे. कांहीं परदेशीय प्रकाशक विद्यापीठांतर्गत अभ्यासासाठी लागणारीं पाठ्यपुस्तकें अतिशय अल्प किंमतींना पुस्तकांच्या बाजारांत विकूं लागले आहेत. त्यामुळें स्थानिक प्रकाशकांना आपला धंदा बसण्याची भीति वाटूं लागली आहे. दिल्ली येथें एका नव्या अमेरिकन प्रकाशक कंपनीनें स्वस्त पाठ्यपुस्तकांचें असेंच एक केंद्र उघडलें आहे. हिंदी विद्यार्थ्यांना जरूर तीं पाठ्यपुस्तकें स्वतः विकत घेतां यावींत म्हणून हें केंद्र स्थापन करण्यांत आलें असून त्याला अमेरिकन सरकारचाच नव्हे, तर भारत सरकारचाहि पाठिंबा आहे. हिंदी विद्यापीठांत ज्या अमेरिकन पाठ्यपुस्तकांची शिफारस करण्यांत आलेली आहे, अशा पुस्तकांचें खूप मोठ्या प्रमाणावर प्रकाशन करण्याचा केंद्राचा इरादा आहे. ह्या पाठ्यपुस्तकांच्या किंमती मूळच्या अमेरिकन पुस्तकांच्या किंमतीपेक्षा बऱ्याच कमी, म्हणजे एकतृतिअंशापेक्षा अगर त्याहीपेक्षा कमी ठेवण्यांत येणार आहेत. पाठ्यपुस्तकांत सर्व तांत्रिक विषयांवरील ताज्यांत ताजी पुस्तकें तर असतीलच; पण त्याशिवाय प्रत्येक विषयावर प्रमाण म्हणून मानलीं गेलेलींहि पुस्तकें असतील. एंजिनिअरिंगसारख्या विषयांवरील ज्या पाठ्यपुस्तकांची किंमत अमेरिकेंत ५० ते ६० रुपये आहे अशीं पुस्तकें भारतांत ९ ते १० रुपयांना देण्यांत येणार आहेत. आधुनिक प्राणिशास्त्रावरील पुस्तकांची मूळची किंमत ९ रुपये आहे. पण तीहि प्रत्येकी २ रुपयांना देण्यांत येणार आहेत.

---

### परदीप बंदराचा विकास अधिक श्रेयस्कर

कलकत्ता बंदरावरील ताण कमी करणारें जोडबंदर म्हणून हुगळीवरील हालिआ बंदराचा विकास करण्याचा विचार भारत सरकार करीत होतें. ह्या जोडबंदरांतून मुख्यतः अन्नधान्य, कोळसा, यंत्रसामग्री, अशासारख्या जड मालाची आयात-निर्यात करण्यांत यावयाची होती. परंतु आतां असें आढळून आलें आहे कीं ह्या बंदरांतून अशुद्ध लोखंडाचीहि निर्यात केल्याखेरीज तें आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होणार नाहीं. ओरिसा राज्यांतील परदीप बंदराचा लोखंडाच्या निर्यातीसाठी विस्तार करणें अधिक सोयीचें होणार आहे. हालिआ जोडबंदर ओरिसांतील लोखंडाच्या खाणीपासून लांब असलें तरी त्यांना जोडणारा रेल्वेरस्ता आजच उपलब्ध आहे. परदीप बंदरांतून लोखंड परदेशीं पाठवावयाचें ठरल्यास तें बंदरापर्यंत मालमोटारींनें न्यावें लागेल. दोन्ही बंदरांच्या विस्ताराचा तौलनिक नफातोटा अद्याप अजमावण्यांत आलेला नाहीं.

### सोनें गाळण्याचा सहकारी कारखाना

सुवर्णकारांना १४ कॅरेट कसाचें सोनें उपलब्ध करून देण्यासाठी मद्रास येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा कारखाना काढण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्याच्या भट्टींतून १४ कॅरेट कसाचें ९ किलोग्रॅम वजनाचें सोनें रोज तयार करण्यांत येईल. त्यासाठी कारखान्याला रोज ५ किलोग्रॅम वजनाचें शुद्ध सोनें लागेल. कारखान्यांत तयार होणारें १४ कॅरेटचें सोनें सोनारांना ५ व १० ग्रॅमच्या गोल तुकड्यांच्या स्वरूपांत आणि कांड्यांच्या स्वरूपांत पुरविण्यांत येईल. कारखान्यांत ४५० सोनारांना रोजगार मिळूं शकेल असा अंदाज आहे. कारखान्याला लागणारा शुद्ध सोन्याचा पुरवठा लोकांच्या दागिन्यांतून व परवानेदार सुवर्णविक्रेत्याकडून मिळविण्यांत येईल.

### संयुक्त राष्ट्र संघटनेचा कांगोमधील खर्च

कांगो स्वतंत्र झाल्यानंतर तेथील सरकारला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें आतांपर्यंत इतर कोणत्याहि कामापेक्षा अधिक खर्च केला आहे. मदतीसाठी करण्यांत आलेला खर्चाचा आंकडा ५.६ कोटी डॉलर्सपर्यंत आला आहे आणि तरीहि कांगोची आर्थिक परिस्थिति अद्याप मजबूत पायावर उभारली गेलेली नाहीं. संयुक्त राष्ट्र संघटनेनें केलेल्या मदतीशिवाय अमेरिकेनें ८ कोटी डॉलर्स देऊन आयातीबद्दलचें देणें भागविलें. पश्चिम जर्मन सरकारनें कांगोला ५० लाख डॉलर्स दिलेले आहेत. त्यांपैकीं निम्मी रक्कम कर्जाऊ देण्यांत आली असून बाकीची देणगी म्हणून देण्यांत आलेली आहे. कांगोचा प्रश्न समाधानकारक सोडविणें संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रतिष्ठेची बाब झालेली आहे.

### सिनेमाच्या धंद्याला लागणाऱ्या सामानाची आयात

चित्रपटाच्या धंद्याला लागणारें सामान आयात करण्यासंबंधींची एक नवी योजना भारत सरकारनें जाहीर केली आहे. परदेशीं दाखविण्यासाठी पाठविण्यांत येणाऱ्या चित्रपटांच्या उत्पन्नांतून आयातीची किंमत देण्यांत येणार आहे. काळ्या-पांढऱ्या चित्रपटांच्या परदेशीं निर्यातीमुळें जें उत्पन्न मिळेल त्या उत्पन्नाच्या २५ टक्के उत्पन्न आणि रंगीत चित्रपटांच्या निर्यातीमुळें होणाऱ्या उत्पन्नापैकीं ८० टक्के उत्पन्न चित्रपटांसाठी लागणाऱ्या साहित्याची आयात करण्यासाठी वापरतां येईल. ही योजना १ जुलै, १९६३ पासून अमलांत आणण्यांत आली असून त्या तारखेनंतर मिळालेल्या परदेशीय चलनाचाच योजनेप्रमाणें उपयोग करतां येईल. चित्रपटांसाठी लागणारी फिल्म, स्टुडिओंतील साधनें, रसायनें, छायाचित्रांचा कागद, प्रसाधनाचीं साधनें, इत्यादि माल ह्या पद्धतीनें आयात करतां येईल.


बँकिंगच्या कोणत्याहि सोयीसाठी

**महाराष्ट्र बँकेचे सर्व शाखाधिकारी**

आपणांस आनंदानें व तत्परतेनें साहाय्य देतील.

★ भारतांतील कोणत्याहि गांवचे चेक्स, ड्राफ्टस्, बिलें खात्यावर जमा करून मिळतात.
★ सर्व प्रमुख शहरांवरील ड्राफ्टस् दिले जातात.
★ आपल्या विम्याचे हप्ते किंवा इतर नैमित्तिक पैसे पाठविण्याचीं कामें स्वीकारलीं जातात.
★ सेवानिवृत्त लोकांचें पेन्शन, तसेंच शेअर्स, डिबेंचर्स, कर्जरोखे इ. वरील व्याज वसूल केलें जातें.
★ शेअर्स व कर्जरोखे यांची खरेदी-विक्री केली जाते.
★ आपल्या मौल्यवान् वस्तु सुरक्षित ठेवण्यासाठी बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय मुख्य कचेरींत व इतर अनेक शाखांत केली आहे.
★ परदेशी हुंडणावळीचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

## महाराष्ट्राची वनसंपत्ति

### जंगलाचे विविध उपयोग

महाराष्ट्र राज्यांत जंगलांखालील एकूण क्षेत्र १६६·१३ लाख एकर म्हणजे राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१·८ टक्के किंवा एक-पंचमांश इतकें आहे. सबंध भारताच्या बाबतींत हें प्रमाण सुमारें २२·३ टक्के आहे. या बाबतींत जगांतील इतर कांहीं देशांचे आकडे पाहणें उद्बोधक ठरेल.

| देश | जंगलक्षेत्र शें· प्रमाण |
|---|---|
| फिन्लंड | ६४·४ |
| स्वीडन | ५१·४ |
| सोव्हियट युनिअन | ४५·० |
| ऑस्ट्रिया | ३८·१ |
| उत्तर अमेरिका | ३३·३ |
| झेकोस्लोव्हाकिया | ३२·९ |
| युगोस्लाव्हिया | ३२·७ |
| जर्मनी | २६·८ |
| नॉर्वे | २३·८ |
| फ्रान्स | १९·१ |
| इटली | १८·७ |
| स्पेन | ९·७ |
| सबंध जग | २७·६ |

आपल्या राज्यांत जंगलांखाली जेवढें एकूण क्षेत्र आहे त्याच्या सुमारें दोन-तृतीयांश म्हणजे १०२·६३ लाख एकर क्षेत्र राखीव जंगलाखालीं आहे. अशा जंगलाच्या बाबतींत एक पद्धतशीर कार्यक्रम ( वर्किंग प्लॅन ) आंखून त्याप्रमाणें जंगलाची सर्व व्यवस्था करण्यांत येते.

जंगलापासून माणसाला विविध प्रकारचे फायदे होतात. यांपैकी कांहीं प्रत्यक्ष स्वरूपाचे असतात, तर कांहीं अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. नद्यांतील पुरांचें जंगलांमुळें नैसर्गिकरीत्या नियंत्रण होतें. तसेंच, जंगलें पावसाचें बरेंचसें पाणी जमिनींत जिरवतात व त्यामुळें जमिनीच्या पोटांतील पाण्याचा सांठा वाढतो. तसेंच पावसाच्या पाण्याबरोबर जमिनीच्या पृष्ठभागावरील माती वाहून जाण्यास अटकाव करून जंगलें जमिनीची धूप थांबवितात. जंगलांमुळें हवेंतील आर्द्रता वाढते, बाष्पीभवन कमी होतें आणि जमिनींतील ओलावा टिकून राहतो.

हे झाले जंगलांचे अप्रत्यक्ष फायदे. प्रत्यक्ष स्वरूपाचे फायदे म्हणजे जंगलापासून मिळणारा विविध प्रकारचा माल होय. यांत इमारती लांकडाचा क्रमांक अर्थात् पहिला लागतो. दुय्यम जंगलमालांत वनस्पति, प्राणिज व खनिज पदार्थांचा अंतर्भाव होतो.

आपल्या राज्यांतील जंगलांत मिळणाऱ्या इमारती लांकडामध्यें साग हें अर्थात् सर्वांत महत्त्वाचें लांकूड होय. बांधकाम व फर्निचर यांसाठी सागासारखें दुसरें लाकूड नाही. बोटी व होडयांची बांधणी, डोलकाठ्या व वल्हीं, आगगाडयांचे डबे, वाघिणी व रेल्वेचे स्लिपर हे सागाच्या लांकडाचे आणखी कांहीं ठळक उपयोग सांगतां येतील. आपल्या राज्यांतील जंगलांत मिळणाऱ्या इमारती लांकडांच्या इतर जाती म्हणजे चंदन, किंजळ, ऐन, नाना, शिसम, बिजासार, निवस, धामण, खैर, बाभूळ, हळद व शेमळ. यांत चंदन हें त्याच्या सुगंधामुळें सर्वांत अधिक मूल्यवान् लांकूड होय.

जळाऊ लाकडाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या जाति म्हणजे बाभुळ, ऐन, धावडा, खैर, किंजळ, जांभूळ, व चिंच, या होत. आपल्या राज्यांतील जंगलांत या जातींचीं झाडें अमाप आहेत. कोळसा पाडण्याच्या दृष्टीनें बाभूळ, धावडा, ऐन, खैर, शिसू, हिरडा, पळस या जाति विशेष चांगल्या होत. जळाऊ लांकडांचें राज्याचें एकूण उत्पादन ५३ लाख घनफूट इतकें आहे.

दुय्यम स्वरूपाचा जंगलमाल हा मुख्यतः पुढील प्रकारचा असतो. ( १ ) धागे व तंतु, ( २ ) गवत, बांबू व वेत, ( ३ ) अर्कयुक्त पदार्थ, ( ४ ) टॅन व रंग, ( ५ ) डिंक व रेसिन, आणि ( ६ ) प्राणिज व खनिज पदार्थ.

ज्यापासून धागा मिळतो अशीं आपल्या जंगलांतील महत्त्वाचीं झाडें म्हणजे भेंडी, आपटा व घायपात हीं होत. या झाडांपासून मिळणारा धागा दोऱ्या व नाडे तयार करण्याकरितां वापरतात. तंतु ( फ्लॉस ) हा पदार्थ सावरीसारख्या झाडांपासून मिळतो. सावरीचा 'कापूस' असेंहि त्याला म्हणतात. हा 'कापूस' रेशमासारखा मऊ व नरम असल्यानें उशा व गिरद्यांत भरण्यासाठी तो फार उत्तम होय.

गवत, बांबू व वेत यांचे उपयोग कोणाला सांगण्याची गरज नाहीं. आपल्या राज्यांत गवताचीं उत्तम कुरणें हीं मुंबई शहराच्या उत्तरेस समुद्रकिनारा व पश्चिम घाट यांच्यामधील ठाणें जिल्ह्याच्या ज्या पट्टींत १०० इंचांच्या आसपास पाऊस पडतो त्या भागांत आहेत. या भागांत मोशी नांवाचें गवत येतें. हें गवत अतिशय कसदार असून त्याला भाव पण फार चांगला मिळतो. मुंबई शहरांत त्याचा खप विशेष. राज्याच्या बहुतेक जिल्ह्यांत कुरणें आहेत व मारवेल ही गवताची प्रमुख जात होय. तथापि विशेष चांगलीं कुरणें हीं कृष्णाकांठीं जेथें ४० इंचांहून कमी पाऊस पडतो त्या भागांत आहेत.

रोशा गवताचें तेल हा राज्यांतील जंगलापासून मिळणारा एक महत्त्वाचा पदार्थ होय. रोशा गवत पाण्यांत घालून त्याचा अर्क काढून हें तेल मिळतें. सुगंधी अत्तरें व साबण तयार करण्याकरितां या तेलाचा उपयोग होतो. या गवताच्या मोतिया व सोफिया अशा दोन जाति आहेत.

कुसुम व निंब या झाडांच्या बियांपासून तेल मिळतें व हें तेल उद्योगधंद्यांत व विशेषतः साबण तयार करण्याकरितां उपयोगी पडतें. तरवड, कर्कई, चिल्हार, बाभूळ व ऐन या झाडांच्या सालींचा कातडीं कमावण्यासाठी उपयोग होतो; तर बाभूळ, धावडा व मोयी या झाडांपासून मिळणारा डिंक हा कापडावरील छपाई, चिकट कागद, मिठाई व औषधें तयार करण्याच्या कामीं उपयोगी पडतो. सलाई व बिजासार या झाडांपासून मिळणारा 'गमरेसिन' हा पदार्थ औषधांच्या व इतर उद्योगधंद्यांत वापरतात.

हिरड्यापासून उत्तम प्रकारचें टॅनिन मिळतें. हिरड्याचा आणखी एक उपयोग म्हणजे त्यापासून मिळणारा रंग. हा रंग सूत व रेशीम रंगविण्यासाठी वापरतात. तसेंच, या रंगापासून शाईहि बनवितात.

टेंभुर्णीचीं पानें विड्या वळण्यासाठी वापरतात. त्यासाठी आपट्याच्या पानांचाहि उपयोग करतात. हाताच्या तळव्याहूनहि मोठीं असलेलीं पळसाचीं पानें पत्रावळी व द्रोण तयार करण्याकरितां वापरतात. अंजन हें तर महाराष्ट्रांत बऱ्याच भागांत आढळणारें झाड. अंजनाचा पाला म्हणजे गुरांचें पौष्टिक खाद्य. गायीम्हशींना हा पाला खावयास घातला तर दुधाचें उत्पादन हमखास वाढतें. निंब व शिरस या झाडांचाहि पाला वैरणीसाठी फार चांगला असतो. विशेषतः दुष्काळाच्या दिवसांत या पाल्यांची वैरण फारच उपयुक्त ठरते.

जंगलापासून मिळणारे प्रमुख प्राणिज पदार्थ म्हणजे लाख,

मध व मेण, शिंगें व चामडीं. व्हार्निश, सिमेंट, लाखकाम, लिथोग्राफ काम, ग्रामोफोन रेकॉर्ड्‌स, सिलें इत्यादि अनेक कामांसाठी लाखेचा उपयोग होतो.

मध व मेण हे जंगलांतील मधमाशांच्या पोळ्यांपासून मिळतात. मध, अन्न व औषधी म्हणून किती उपयुक्त आहे हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. मेणाचा उपयोग मुख्यत: मेणबत्त्या, लाकडाचें पॉलिश व सिलाचें मेण तयार करण्यासाठी होतो.

राज्यांतील जंगलांत वाघ, चित्ते, नीलगायी, सांबरें, चितळ इत्यादि अनेक प्रकारचे प्राणी आहेत. या वन्य प्राण्यांचीं शिंगें व कातडीं हें जंगलमहसुलाचें एक चांगल्यापैकी साधन आहे. वाघ, चित्ता व सांबर यांचीं कातडीं आणि भुसा भरलेले मुखवटे यांना फार चांगली किंमत येते. तसेंच या शिंगांच्या हरतऱ्हेच्या सुंदर वस्तु बनवितात.

औषधी वनस्पतींमध्यें हिरडा, बेहडा व आवळा या प्रमुख जाती होत. अनेक आजारांवर रामबाण औषध म्हणून समजलें जाणारें सुप्रसिद्ध त्रिफळा चूर्ण हें या झाडांच्या फळांपासून बनवितात. बेल व जांभूळ या झाडांचीं फळेंहि औषधी आहेत.

---

## ब्रिटन-रशिआचें आकाशवाणीवर सहकार्य

ब्रिटन व रशिया ह्यांच्या दरम्यान आकाशवाणीवरील कार्यक्रम प्रक्षेपित करण्याच्या कामीं सहकार्य करण्याचा करार झाला आहे. करारांत ठरल्याप्रमाणें अनुबोधपट, चालू घडामोडी, संगीत, खेळ, इत्यादि बाबतीमधील एकमेकांचे कार्यक्रम एकमेकांनीं ध्वनिक्षेपित करावयाचे आहेत. त्याचप्रमाणें, उभयतां देशांतील दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी परस्परांनीं एकमेकांस स्टुडिओ, उपकरणें व तंत्रज्ञ ह्यांच्या बाबतींत साह्य करावयाचें आहे. ब्रिटन व रशिआ ह्यांच्या आकाशवाणी संघटनांच्या प्रमुखांमध्यें अशाप्रकारचें सहकार्य करण्याबद्दल वाटाघाटी चालू होत्या. दोन्ही देशांच्या आकाशवाणी संघटनेंत काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांची विशेष कारणासाठी तात्पुरती अदलाबदल करण्याची सोयहि करारांत करण्यांत आली आहे. ब्रिटनच्या आकाशवाणीचे प्रमुख लवकरच रशिआला भेट देणार आहेत.

---

## कातडीं कमावण्याचीं नवीन केंद्रें

मध्यवर्ती कातडीं संशोधन संघटनेनें गुजरात व राजस्थानांत अनेक ठिकाणीं कातडीं कमावण्याचीं कायमचीं केंद्रें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या संघटनेच्या राजकोट येथील शाखेनें गोव्यांत कातडीं कमावण्याचीं प्रात्यक्षिकें देण्याचें ठरविलें आहे. सातारा येथेंहि अशींच प्रात्यक्षिकें दाखविण्यांत येतील. राजकोट येथील कातडीं कमावण्याचें केंद्र ५ वर्षांपूर्वी गुजरात खादी-बोर्डानें स्थापन केलेलें आहे; परंतु आतां तें मध्यवर्ती संघटनेतर्फे चालविलें जातें. गेल्या तीन वर्षांत त्याच्या उत्पादनांत वाढ होत आहे. १९६१-६२ सालीं केंद्रानें ६८,००० रुपयांचा माल निर्माण केला. १९६३-६४ सालांत ३ लाख रुपयांचा माल निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. राजकोट येथील केंद्रानें आतां शार्क माशांचें कातडें कमावण्याचें ठरविलें आहे. वेरावळ येथील मच्छीमारी केंद्राकडून शार्क माशांचा पुरवठा करण्यांत येणार आहे. शार्कच्या कातड्याच्या निर्यातीमुळें परदेशीय चलनाची प्राप्ति होत असते.

---

## भारतासाठी नव्या बोटींची बांधणी

भारतासाठी ६९,००० हजार टन वजनाच्या नव्या बोटींची बांधणी करण्यांत येत आहे. परदेशांतून मिळविण्यांत आलेल्या बोटी आणि विझगापट्टम्‌ येथील गोदींत बांधण्यांत आलेल्या बोटी जमेस धरतां, गेल्या वर्षीच्या जूनअखेर भारताजवळ १० लाख टन वजनाच्या बोटी होत्या. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, शिंदिया स्टीम आणि जयंती शिपिंग ह्यांच्यासाठी बांधण्यांत येत असलेल्या नव्या बोटी मिळाल्या म्हणजे भारताच्या बोटींच्या काफिल्यांत १९६३ सालीं चांगली भर पडेल. 'स्टेट ऑफ पंजाब' ही भारतांत बांधण्यांत आलेली सर्वांत मोठी बोट असून तिचें वजन ९१९१ टन आहे. ही बोट शिपिंग कॉर्पोरेशनसाठी बांधण्यांत आली. कलकत्ता व मुंबई येथील कारखान्यांतून बंदरांतील कामासाठी व किनाऱ्याजवळ वापरण्यासाठी छोट्या बोटी बांधण्यांत येतात.

---

## घरीं वापरण्यासाठी लागणारें पाणी

नागपूर येथील मध्यवर्ती सार्वजनिक आरोग्य-विषयक एंजिनिअरिंग संशोधन संस्थेनें भारताला लागणाऱ्या पाणीपुरवठ्यासंबंधीं पाहणी केली आहे. पहाणीवरून काढण्यांत आलेल्या निष्कर्षांवरून असें दिसतें कीं, हिंदमधील ४४ कोटी लोकांना घरच्या व्यवहारासाठी रोज १,५०० कोटी गॅलन पाण्याची गरज आहे. लोकसंख्येची वाढ आणि उद्योगधंद्यांचा विकास जसजसा होत जाईल तसतशी पाण्याची गरज आणखीच वाढत जाणार आहे. शहरांत राहणाऱ्या कांहीं अल्पसंख्य लोकांनाच संरक्षित पाण्याचा लाभ सध्यां होऊं शकतो. ग्रामीण भागांत राहणाऱ्या कोट्यवधि लोकांना असुरक्षित व जमिनीमधील पाण्यावर अवलंबून राहावें लागतें. दिल्लीच्या आसपासच्या ग्रामीण विभागांतील ८० टक्के विहिरींचें पाणी पिण्यासारखें नाहीं. शिवाय, त्यांत आरोग्यास हानिकारक क्षारहि अधिक असतात.

---

## शिवणाच्या यंत्रांना लागणारे सुटे भाग

शिवण्याचीं यंत्रें तयार करण्यासाठी लागणाऱ्या कांहीं सुट्या भागांच्या निर्यातीवर बंधनें घालण्यांत आल्यामुळें पंजाबमधील यंत्रें तयार करणाऱ्या कारखानदारांच्या संघटनेनें तक्रारीचा ठराव केला आहे. सुट्या भागांवर घालण्यांत आलेल्या बंधनामुळें लुधिआना येथील ५० कारखान्यांना अडचणींना तोंड द्यावें लागणार आहे. ह्या कारखान्यांत ३,००० कामगार काम करीत असतात. शिवणाच्या यंत्रांत लागणाऱ्या भागांपैकी ११ भाग सध्यां परदेशांतून आयात करावे लागतात. भारतामधून निर्यात होणाऱ्या हलक्या वजनाच्या मालांत शिवणाच्या यंत्रांचा समावेश आहे. खुद्द लुधिआना व त्याच्या आसपासच्या भागांतून ३,००० पूर्ण शिवणाचीं यंत्रें निर्यात करण्यांत येतात.

---

## इटालिअन कंपनीशीं करार

पूर्व भारतांत पेट्रोलिअमजन्य पदार्थांची वाहतूक करण्यासाठी एका इटालिअन कंपनीशीं तेलाचे नळ घालण्याचा करार इंडिअन रिफायनरीज लि. ह्या कंपनीनें केला आहे. करारांतील कामें करण्यासाठी ११·३३ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी ५·३० कोटी रुपयांची रकम परदेशीय चलनांत लागणार आहे. इटालींतील एका कंपनीच्या गटाकडून भारताला १० कोटी डॉलर्स कर्ज देण्यांत आलेलें आहे. त्यांतून वरील खर्च करण्यांत येईल.

## व्यावसायिक वेतनपाहणीचा अहवाल

मध्यवर्ती मजूर आणि रोजगार खात्याच्या लेबर ब्यूरोनें व्यावसायिक वेतनपाहणीविषयक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालांत एकूण ४४ प्रमुख उत्पादक आणि खाण धंदेउद्योग व मळेउद्योग यांचा समावेश करण्यांत आला आहे. या पाहणींत दिसून आलेल्या निष्कर्षावरून बहुतेक धंद्यांतील सर्व कामगारांना दररोज सरासरी २·०१ ते ५ रुपयांपर्यंत मिळकत होते असें दिसून आलें. तथापि, प्रत्येक धंद्यांतील सर्व मजुरांची सरासरी मिळकत विचारांत घेतली तर तिचें प्रमाण धंद्याधंद्यागणिक बरेंच वेगवेगळें असल्याचें दिसतें. आगकाड्या, विड्या यांचे कारखाने, काजूचे कारखाने, तंबाकूवर प्रक्रिया करणारे कारखाने, नट-बोल्टचे कारखाने आणि मळेउद्योग यांसारख्या सूत्रबद्ध नसलेल्या आणि शेतमालाच्या उद्योगधंद्यांत कीं ज्यांतील बहुसंख्य कामगार कुशल असण्याची जरूरी नसते. अशा उद्योगधंद्यांतील कामगारांचें सरासरी वेतन किंवा मिळकत दिवसाला २ रुपये किंवा त्याहूनहि कमी असते; तर कापडगिरण्या, इंजिनियरिंग, सिमेंट, कागद, पेट्रोलियम, तेलशुद्धीकरण, सिगारेट, कोळसा आणि यांसारख्या तांत्रिक कौशल्य लागणाऱ्या उद्योगधंद्यांतील कामगारांचें दररोजचें सरासरी वेतन २ रुपयांपेक्षा अधिक पडतें.

अर्क काढणारे कारखाने, शुद्धीकरण कारखाने, जहाजबांधणी आणि दुरुस्ती कारखाने, पेट्रोलियम शुद्धीकरण कारखाने, साबण कारखाने आणि सिगरेटचे कारखाने या कारखान्यांत अधिक म्हणजे सरासरी दररोज ५ रुपयांहून अधिक वेतन मिळतें.

कपडे, विडीकारखाने आणि कॉफी आणि रबर मळे नि अभ्रक खाणी यांचा अपवाद वगळतां जवळजवळ सर्वच धंदेउद्योगांत जादा कामाची पद्धत असल्याचें पाहणींत आढळून आलें. कांहीं उद्योगधंद्यांपैकी ५० टक्के उद्योगधंद्यांत तर कांहीं बाबतींत १० टक्के उद्योगधंद्यांत ही पद्धत असल्याचें दिसून आलें. त्याबद्दल मिळणाऱ्या जादा वेतनाचें सरासरी प्रमाण तासास ०·४६ रुपयांपासून तों १·९९ रुपये याप्रमाणें धंद्यागणिक वेगवेगळें असल्याचें आढळून आलें.

उत्पादनांत वाढ करण्यासाठी उत्तेजन म्हणून बोनस देण्याची योजना जवळजवळ सर्वच प्रकारच्या उद्योगधंद्यांत सुरू करण्यांत आली असली, तरी त्याचें प्रमाण मात्र अगदींच थोडें म्हणजे १·०१ टक्का पडतें. या योजनेखाली दररोज मिळणाऱ्या सरासरी वेतनाचा विचार करतां तें खाणउद्योगधंद्यांतील ०·०९ रुपयांपासून तों आगपेट्यांच्या कारखान्यांतील ४·३५ रुपयांपर्यंत वेगवेगळें आहे.

## सदोष हातपाय सुधारण्यासाठीं नवीं खेळणीं

ब्रिटनसारख्या प्रगत देशांतहि ६० टक्के मुलांचे हातपाय सदोष असतात आणि त्यांच्याकडे फारसें लक्षहि देण्यांत येत नाहीं. मुलांचे हातपाय सुदृढ करण्यासाठी ब्रिटन, स्वीडन, जर्मनी, इत्यादि पाश्चात्य देशांतून मुलांना नवीन प्रकारचीं खेळणीं देण्यांत येऊं लागलीं आहेत. ह्या खेळण्यांत शिड्या, झोपाळे, लाकडाच्या फळ्या, इत्यादींचा उपयोग करण्यांत आलेला आहे. खेळणीं वापरण्यासाठी मुलांना आपल्या हातापायांचा विविध प्रकारांनीं वापर करावा लागतो. त्यामुळें त्यांची छाती, पाठीचे स्नायु, पोटाचे स्नायू, हातपाय, इत्यादींची चांगली वाढ होते व ते मजबूत बनतात. डॉक्टर्स आणि शिक्षक ह्यांचा ह्या नव्या खेळण्यांना चांगला पाठिंबा आहे.

## नियंत्रित बाजारपेठांमुळें शेतकऱ्यांची दरसाल १२ कोटी रु. ची बचत

निरनिराळ्या राज्यांच्या ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस (मार्केट) कायद्याच्या अंमलाखाली देशांतील १००० हून अधिक बाजारपेठा आलेल्या आहेत.

देशाच्या आर्थिक नियोजनाध्यें शेतमालाची ठराविक नियमांनुसार विक्री करणाऱ्या बाजारपेठांना फार महत्त्व आहे. या बाजारपेठांमुळें निरनिराळ्या सोयी उपलब्ध झाल्या, त्यांमधील प्रचलित चालीरीतीहि सुधारल्या आणि अशा तऱ्हेनें या नियंत्रित बाजारपेठा म्हणजे शेतकऱ्यांना एक प्रकारचें वरदानच ठरल्या आहेत.

दोन वर्षांपूर्वी जी पाहणी करण्यांत आली होती त्यावरून असें दिसून आलें होतें कीं, बाजारपेठांतील दरांचें सुसूत्रीकरण केल्यामुळें शेतकऱ्यांची त्यांच्या मालाच्या किंमतीच्या १·६२ टक्का बचत होते. याचाच अर्थ असा कीं, यामुळें केवळ बाजारच्या खर्चांत शेतकऱ्यांचा दरसाल १२ कोटी रु. चा फायदा झाला आहे. इतकेंच नव्हे, तर आतां शेतकऱ्याला चढाओढीच्या किंमतींत आपला माल विकतां येतो, मालाचें बरोबर वजन केलें जातें व त्याच्या मालाचे पैसे वेळच्या वेळीं अदा केले जातात; आणि यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज शेतकऱ्याला आपले हक्क चांगले कळूं लागले आहेत. तो सहजासहजीं दलालाकडून फसला जात नाहीं.

उत्पादकाला होणारे हे सर्व फायदे लक्षांत घेतां नियंत्रित बाजारपेठांचा कायदा शक्य तों सर्व बाजारपेठांना लागू करण्यांत यावा असें केन्द्रीय अन्न व शेतकी खात्याला वाटतें; आणि ह्याच्या अंमलबजावणीकरतां काय करतां येईल याचा विचार दिनांक २, ३ ऑगस्ट १९६३ रोजीं नवी दिल्ली येथें भरलेल्या शेतकी व समाज विकास मंत्र्यांच्या संयुक्त बैठकींत करण्यांत आला.

तिसऱ्या योजनेमध्यें देशांतील सुमारें २५०० घाऊक बाजारपेठा नियंत्रित कायद्याच्या अंमलाखाली आणण्याचें लक्ष्य आहे. ह्या योजनेची अंमलबजावणी राज्यसरकारांमार्फत होणार आहे. कांहीं राज्यांमध्यें अजून या बाबतींत कायदे व्हावयाचे आहेत तर कांहीं राज्यांनीं कायदे पास करूनहि त्यांची अंमलबजावणी पाहिजे तेवढ्या वेगानें होत नाहीं.

## तेलशुद्धीचा आणखी एक कारखाना

रशियाच्या तांत्रिक सहकार्यानें तेल शुद्ध करण्याचा आणखी एक कारखाना गुजरात राज्यांत काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत मोटारींना लागणारें तेल निर्माण करण्यांत येईल आणि त्यामुळें हिंद ह्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल. कारखान्यांत दरसाल सुमारें ३ लाख टन पेट्रोल तयार होईल. कारखान्याचा आराखडा तयार करण्याचें काम रशिअन तंत्रज्ञांनीं हातीं घेतलें आहे. कारखान्यांतील उत्पादनांत शक्यतों स्थानिक कच्चा माल वापरण्यांत येणार आहे.

## मॉस्को-मुंबई थेट प्रवास

एअर इंडिआ इंटरनॅशनलच्या कांचनगंगा ह्या ७०७ बोईंग विमानानें मॉस्को ते मुंबई हा प्रवास मध्यें कोठेंहि न थांबतां एका दमांत केला. मॉस्को ते मुंबई हें अंतर ३,८७५ मैल असून तें तोडण्यास विमानाला ६ तास ५२ मिनिटांचा अवधि पुरला. विमानाचा सरासरी वेग दर तासाला ५६४ मैल पडला. मॉस्को ते मुंबई हा प्रवास एकदम करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### अधिक पोलाद निर्माण करण्याची खटपट

मध्यवर्ती सरकारचे पोलादाचे उपमंत्री श्री. पी. सी. सेठी ह्यांनीं भारतामधील पोलादाच्या उत्पादनाच्या परिस्थितीसंबंधीं आणि उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नासंबंधीं कांहीं माहिती सांगितली आहे. मद्रास येथें पोलादाच्या उत्पादनासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या कारखान्याला अमेरिकेकडून मदत मिळण्याची आशा सोडून देण्याचें कारण नाहीं. बोकॅरो येथील कारखान्यासंबंधीं लवकरच निर्णय घेण्यांत येईल. ह्या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल मिळण्याच्या शक्यतेचा अंदाज बांधण्यासाठी लवकरच एक अमेरिकन तज्ज्ञ भारतांत येणार आहे. त्याची पहाणी शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यांत येणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १·८ कोटी टन पोलादाची मागणी येईल अशी अपेक्षा आहे. ही मागणी भागविण्यासाठी आणखी पोलादाचे कारखाने काढण्याच्या शक्यतेचा अभ्यास सरकार करीत आहे. आंध्र प्रदेशांतील विशाखापट्टम् भागांत अशुद्ध लोखंड सांपडतें त्याचप्रमाणें मध्यप्रदेशांत बस्तर भागांतहि सांपडतें. ह्या दोन्ही ठिकाणीं पोलादाचे कारखाने काढता येतील किंवा नाहीं, ह्याविषयीं प्राथमिक अहवाल तयार करण्याचें काम हिंदुस्थान स्टील कंपनीला सांगण्यांत आलें आहे. बेल्लारी–होस्पेट–गोवा विभागांत एक पोलादाचा कारखाना काढण्याची शक्यताहि अजमावण्यांत येत आहे. सरकारच्या मालकीचे सार्वजनिक पोलाद कारखाने उत्पादनाच्या कार्यक्रमाप्रमाणें उत्पादन करीत आहेत. ह्या कारखान्यांच्या विस्ताराचीं कामें पूर्ण झालीं म्हणजे भिलाई येथील कारखान्यांत दरसाल २५ लाख टन, रुरकेला येथील कारखान्यांत १८ लाख टन आणि दुर्गापूर येथील कारखान्यांत १६ लाख टन पोलाद निर्माण होऊं लागेल. बोकॅरो येथील संकल्पित कारखान्यांत प्रथम १४ लाख टन पोलाद उत्पादन करतां येईल. पण नंतर तें ४० लाख टनांपर्यंत वाढवितां येईल.

---

### रशियाची बाजारपेठ चांगली आहे


मॉस्को येथें भरविण्यांत आलेल्या हिंदी मालाच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगीं इंडिअन कॉटन मिल्स फेडरेशनचे उपाध्यक्ष श्री. मदनमोहन मंगळदास गेले होते. प्रदर्शनाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं ह्या व्यापारी संबंधामुळें उभयतां देशांतील देवाणघेवाण वाढीला लागेल. रशियांत चांगल्या दर्जाच्या उपभोग्य वस्तूंना चांगली बाजारपेठ मिळू शकेल. रशियन लोकांना कापड, तयार कपडे, सिगारेटस, चहा, इत्यादि माल विकत घेण्याची इच्छा दिसली. रशियांतील लोकांचें वेतन दरमहा ४५ रुबल्स अथवा सुमारें २२० रुपयांपासून ७०० रुबल्स अथवा सुमारें ३५०० रुपयांपर्यंत असलेलें आढळून आलें. त्यांतहि सरकारी अगर निमसरकारी संस्थांतील वरिष्ठ अधिकारी, शास्त्रज्ञ, कलावंत, इत्यादींना सर्वांत अधिक वेतन मिळत असतें. रशियाबरोबर होणारा भारताचा व्यापार सध्यांच्या औद्योगिक प्रदर्शनामुळें मोठ्या प्रमाणावर वाढण्यास अनुकूल वातावरण आतां तयार झालें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल रु. ९·८३ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ११·३३ "
ठेवी रु. ३५९·९२ "
खेळतें भांडवल रु. ३९४·५२ "
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकद्वारी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

# विविध माहिती

**बिनजोडाचे पोलादी नळ**—बिनजोडाचे पोलादी नळ तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा एक कारखाना पंजाबमध्यें काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ५ कोटी रुपये भांडवल लागेल. त्यांत दरसाल ३६ हजार टन वजनाचे नळ तयार करण्यांत येतील. भांडवलापैकी २ कोटी रुपयांचें भांडवल परदेशीय चलनाच्या रूपांत लागेल. मद्रास, बंगाल व गुजरात राज्यांतूनहि असे नळ तयार करण्यासाठी परवाने देण्यांत आले आहेत.

**परदेशी मोटारींची लिलांवानें विक्री**—गोव्याची मुक्तता करण्याच्या प्रसंगीं अगर त्यामुळें ज्या परदेशी मोटार अगर मोटार सायकली त्यांच्या मालकांनीं तेथें सोडून दिलेल्या आहेत, त्यांची विक्री लिलांवानें करण्यांत येणार आहे. हा माल लिलांवानंतर गोव्याबाहेर नेतां येईल. गोवा, दीव व दमण मिळून अशा ५२ मोटारगाड्या व २८ मोटार सायकली आहेत. लिलांव १८ जुलैपासून ८ ऑगस्टपर्यंत करण्यांत येईल.

**वृत्तपत्रांना लागणारा कागद**—वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्या कामीं अमेरिकेंतील मोठ्या कागद-कारखानदारांचें सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. कागद धंद्यांतील एक अमेरिकन तज्ज्ञ भारतांत आला असून उसाच्या चिपाडांपासून कागद निर्माण करण्यास भारतांत खूप वाव आहे असें मत त्यानें व्यक्त केलें आहे.

**संरक्षणखात्याच्या मुलकी उत्पादनांत वाढ**—१९६२ च्या ऑक्टोबरमध्यें आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यांत आल्यापासून संरक्षण खात्याच्या मुलकी उत्पादनांत चांगली वाढ झाली आहे. चालू वर्षाच्या फेब्रुवारीनंतरचे आंकडे उपलब्ध नसले तरी उत्पादनाची वाढ चालू ठेवण्यांत आली आहे. मालवाहू मोटारी, जीपगाड्या, रस्ते करण्याचे रूळ, यांत्रिक हत्यारें, विजेऱ्या, इत्यादींचें उत्पादन वाढलें असून साध्या मोटारी, स्कूटर्स, शीतपेटिका, इत्यादि कमी आवश्यक व चैनीच्या वस्तूंचें उत्पादन घटलें आहे.

**तिरुचिरापल्ली येथील बंदुकीचा कारखाना**—तिरुचिरापल्ली येथें रायफली तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याचें उत्पादन पूर्णांशानें चालू झाल्यानंतर त्यांत सुमारें ८,००० कामगारांना रोजगार मिळेल. कारखान्यासाठी लागणारी जमीन आसपासच्या खेडेगांवांतून ताब्यांत घेण्यांत येणार आहे. सहा खेडेगांवांतून मिळून सुमारें ३,३०० एकर जमीन ताब्यांत घेण्यासंबंधीं कायदेशीर कारवाई चालू झाली आहे.

**दरबानमधील कचेरी बंद**—एअर इंडिया इंटर नॅशनलनें दक्षिण आफ्रिकेंतील दरबान शहरांतील आपली कचेरी बंद केली आहे. ही कचेरी कांहीं व्यापारी कामें करण्यासाठी आणि हिंदी नागरिकांची प्रवासाची सोय करण्यासाठी १९५२ सालीं उघडण्यांत आली होती. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णभेदाच्या धोरणाला विरोध करण्यासाठी त्या देशाविरुद्ध राजनैतिक व आर्थिक दंडयोजना करण्याचा ठराव संयुक्त राष्ट्र संघटनेनें १९६२ सालीं केलेला आहे. ह्या ठरावास अनुसरून कचेरी बंद करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे.

**कम्युनिस्ट पक्षांत फूट पाडण्याचा आरोप**—रशिआ व चीन ह्यांच्यामधील वैचारिक मतभेदांच्या चर्चेंत दोन्ही पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. रशिआच्या 'प्रवदा' ह्या वृत्तपत्रांत असा आरोप करण्यांत आला आहे कीं, चीन, अमेरिका, इटली, बेल्जम, ऑस्ट्रेलिआ आणि भारत ह्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांत फूट पाडून पक्षविरोधी गट स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि पक्षद्रोही गटांमार्फत अश्लाघ्य विधानें करीत आहे.

**तारापूरजवळ विमानें उतरण्याची सोय**—तारापूर येथें बांधण्यांत यावयाच्या अणुशक्तीवरील वीजकेंद्राच्या सोयीसाठी जवळच विमानें उतरण्याची एक घसरपट्टी बांधण्यांत येणार आहे. केंद्र बांधण्यासाठी लागणारी साधनसामग्री उतरविण्यासाठी तिचा उपयोग करण्यांत येईल. केंद्रासाठी सुमारें ७० एकर जागा लागणार असून ती ताब्यांत घेण्याची कारवाई महाराष्ट्र सरकार करीत आहे. केंद्रासाठी लागणारा रुपयाच्या चलनांतील १६ कोटी रुपये खर्च मध्यवर्ती सरकार करणार आहे.

**कलता मनोरा सांवरण्याचा प्रयत्न**—इटलीमधील सुप्रसिद्ध पिसा येथील कलता मनोरा अधिक झुकू नये म्हणून त्याचा पाया मजबूत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ३० लाख डॉलर्स खर्च येणारी योजना तयार करण्यांत आली आहे. हा सुंदर मनोरा १२ व्या शतकांत बांधण्यांत आला असून तो उत्तरोत्तर अधिक कलू लागला आहे. मुळांत मनोऱ्याचें वरचें टोंक लंबरेषेच्या १० इंच बाहेर होतें. आतां हे टोंक लंब रेषेच्या १७ फूट बाहेर कललेलें आहे.

**सीलोनला तेल पुरविण्याची तयारी**—इंडिअन स्टेट पेट्रोलिअम कॉर्पोरेशननें सीलोनला तेल पुरविण्याची तयारी दाखविली आहे. जागतिक किंमतीपेक्षा अगर रशिअन तेलाच्या किंमतीपेक्षाहि कमी किंमतीला तेल पुरविण्याचा कॉर्पोरेशनचा मानस आहे. सीलोनमध्यें स्थापन करण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्याला अशुद्ध तेल पुरविण्यासाठी इंडोनेशिआहि प्रयत्न करीत आहे. सीलोनमधील परदेशीय तेल कंपन्या तेथील सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत.

**दक्षिण विभागांत अधिक धंदा**—१९६२ च्या जानेवारीपासून १९६३ च्या मार्च अखेरच्या काळांत दक्षिण भागांत आयुर्विम्याचा नवा धंदा सर्वांत अधिक झाला आहे. आयुर्विम्याच्या पांच विभागांपैकी दक्षिण विभागांत मद्रास, आंध्र, म्हैसूर आणि केरळ राज्यांचा समावेश होतो. एकूण ७४५ कोटी रुपयांच्या नव्या धंद्यांपैकी २०१ कोटी रुपयांच्या आयुर्विमा पॉलिसी ह्या भागांत देण्यांत आल्या आहेत.

**हिंदी स्कूटर्सची निर्यात**—थायलंडच्या सरकारनें आपल्या पोलिस दलासाठी ७६ लॅंब्रेटा स्कूटर्सची मागणी मुंबईतील एका कारखान्याकडे नोंदविली होती. त्याप्रमाणें स्कूटर्सचा पहिला हप्ता मुंबई बंदरांतून रवाना करण्यांत आला. ह्या पहिल्या हप्त्याची परदेशीय चलनांतील किंमत १ लाख रुपयांची आहे. आग्नेय आशिआंतील आणखीहि एका देशाकडून हिंदी स्कूटर्सना मागणी आली आहे.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०.५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षे–४½ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के, ४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४२,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी.ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

व्याजाचे नवीन आकर्षक दर–

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

कायम ठेव–

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३.३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३.५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३.७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४.२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४.५० टक्के |

याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या. सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

## दि सरदार
## कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

कारबोनिक ॲसिड गॅस

सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी

आणि

खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. २०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०२ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

## सहकारी चळवळींतील वाढते गैरप्रकार

### अधिकार हवा, पण जबाबदारी नको !

महाराष्ट्राची सहकारी चळवळ सर्व देशामध्यें गुणवत्तेनें व आंकडे-वारीनेंहि श्रेष्ठ आहे असें मानलें जातें व तें खरेंहि आहे. गेल्या १०–१५ वर्षांमध्यें खूप मोठी प्रगति सहकारी चळवळीची झाली. परंतु आज एक नवीन भीति निर्माण झाली आहे. आपण एखाद्या सहकारी संस्थेंत असलों तर आपल्यावर कांहीं जबाबदाऱ्या आहेत असें आज पुष्कळ लोक समजत नाहींत. अधिकार, चांगुलपणा पाहिजे, परंतु जबाबदारी नको; अशी प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढते आहे व तिला वेळींच पायबंद घातला गेला नाहीं तर सहकारी चळवळीची वाढ निश्चित खुंटणार आहे.

पैसे कर्जाऊ देण्याचा चांगुलपणा सहकारी सोसायट्यांचे पदाधिकारी, सेक्रेटरी व इतर नोकरवर्ग घेतात. परंतु दिलेला पैसा वसूल करण्याची दक्षता घेत नाहींत. थकबाकी झाल्यामुळें रिझर्व बँकेकडून मिळणारी मदत कमी प्रमाणांत मिळते. नवीन सभासदांना कर्ज देणें शक्य होत नाहीं व म्हणून नवीन सभासदांना सोसायटीविषयीं आपुलकी निर्माण होत नाहीं व त्यामुळें सहकारी सोसायटी म्हणजे ठराविक लोकांची कर्जे मिळण्याची मिरासदारी अशी व्याख्या रूढ होऊं पहात आहे.

सोसायटी म्हणजे एक ट्रस्ट आहे, असें समजून तिचा कारभार हांकण्याची प्रवृत्तीच नष्ट झालेली आहे. उलट, स्वतःच्या फायद्यासाठी सोसायटीस राबविण्याची प्रथा रूढ होत आहे. सहकारी खात्याचाहि दाब कमी झालेला आहे. सोसायटीच्या पैशाचा गैरवापर केला, अपहार केला, नियमबाह्य काम केलें, तरी आपणास कुणी जाब विचारणार नाहीं, अशी समज पुष्कळ सोसायट्यांतील पदाधिकाऱ्यांची झालेली आहे.

### नियमांची कडक अंमलबजावणी हवी

कित्येक सोसायट्यांचें ऑडिट, कित्येक वर्षांचें होणें राहिलेलें आहे व ज्यांचें ऑडिट झालें, त्या ऑडिटमध्यें दाखविलेल्या चुका दुरुस्त करण्याचे तर प्रयत्न होतच नाहींत; उलट आम्ही बिनपगारी सार्वजनिक काम करतों, अशा चुका होणारच, अशी भूमिका कित्येक सोसायट्यांच्या चालकांनीं घेतलेली आहे. वेळेवर हिशोब न लिहिणें, मोठ्या रकमा हातावर शिल्लक ठेवणें, माल तारण नसतांना पैसे देणें, उधार मालाची विक्री करणें, अशा गोष्टी सरसगट होत आहेत. इतकेंच काय, कांहीं ठिकाणीं पैसे नेले नसतांनाहि खोटेच पैसे नांवें मांडल्याचीं उदाहरणें दृष्टोत्पत्तीस येतात. सोसायटीच्या नांवावर माल आणून घरगुती कामाकरितां वापरण्यांतहि कांहीं सभासदांना दिक्कत वाटत नाहीं. सोसायट्यांकडे ट्रक्स, ट्रॅक्टर्स आहेत. त्या ट्रक्स, ट्रॅक्टरवर भरमसाट खर्च करून त्यांतून येणाऱ्या उत्पन्नाचा व खर्चाचा कांहींहि ताळमेळ लावला जात नाहीं. कांहीं ठिकाणीं तर सोसायटीच्या ट्रक–ट्रॅक्टरकरितां आणलेले पार्टस् स्वतःच्याच खाजगी ट्रक-ट्रॅक्टरकरितां वापरल्याच्याहि तक्रारी येत आहेत. सारांश, सहकारी चळवळ जर प्रगत करावयाची असेल, तर कार्यकर्त्यांना कायदेशीर जबाबदारीची संपूर्ण जाणीव करून दिली पाहिजे व जे लोक आपली जबाबदारी ओळखणार नाहींत, त्यांचे विरुद्ध कडक अंमलबजावणी करण्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. आपला दरारा लोकांना वाटेल इतकी कार्यक्षमता सहकारी खात्यास, बँकांस, सुपरवायाझिंग युनियन्स् यांना कारभारांत आणणें जरूर आहे. ती तशी आली तर सहकारी चळवळ निश्चित प्रगतीच्या मार्गावर जाणार आहे.

—सहकारशक्ति १–८–६३.

### संजीवनी सहकारी साखर कारखाना दसऱ्याचे दिवशीं सुरू होणार

नगर जिल्ह्यांतील कोपरगांव तालुक्यांतील टाकळी येथील संजीवनी सहकारी साखर कारखान्याची मेन टरबाइन्स परदेशांतून मुंबईस येऊन पोंहचली असून सप्टेंबरमध्यें ही टरबाइन्स बसवून दसऱ्याच्या मुहूर्तावर ता. २८–९–६३ रोजीं बॉयलरचे अग्निपूजन होणार असल्याचें अधिकृत रीत्या कळतें.

### उषा यंत्रांची निर्गत

येत्या तीन वर्षांत उषा शिवण्याचीं ७२,००० यंत्रें पश्चिम जर्मनीकडे निर्गत केलीं जातील असें जय इंजिनिअरिंग वर्क्सनें जाहीर केलें आहे. कंपनी सध्यां अमेरिकेकडे दरमहा १,५०० आणि ग्रेटब्रिटनकडे १,००० यंत्रें निर्गत करीत आहे.

### हुंडा मागणाराला शिक्षा झाली

जानपूरच्या एका मॅजिस्ट्रेटनें लक्ष्मीनारायण खन्ना ह्यास लक्ष्मीशंकर तंडनकडून हुंड्यादाखल मोटारसायकलीची मागणी केल्याबद्दल २,००० रु. दंडाची शिक्षा केली आहे. दंड न दिल्यास तीन महिने कैदेंत रहावें लागेल. खन्नानें तंडनच्या मुलीशीं लग्न करण्यासाठी मोटार सायकलीची अट घातल्याचें पत्रव्यवहारावरून सिद्ध झालें. ह्या अटीमुळें विवाह होऊं शकला नव्हता.

### टाटा कंपनीचे भागीदार व त्यांचें भांडवल

३१ मार्च, १९६३ रोजीं टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. च्या पटावर ७३,२०४ सभासदांचीं नांवें होतीं. त्यांनीं धारण केलेल्या भागांची वर्गवारी खालीलप्रमाणें होती:—

| शेअर होल्डर्स | प्रेफरन्स भाग | ऑर्डिनरी भाग |
|---|---|---|
| ७२,४७२ व्यक्ति | ७,००,२९४ | २३,४७,२५४ |
| ४५ बँका | ८९,६२७ | ३,५१,४११ |
| २३६ इतर कंपन्या | २,५८,७५७ | ८,७३,३८७ |
| ४५१ इतर | ६६,५२५ | १,०२,२५३ |

एकूण ३८·९५ कोटी रु. दर्शनी किंमतीपैकी व्यक्तींनीं २४·७४ कोटी रुपयांचे भाग ( ६३·५०% ) घेतलेले होते, बँकांनीं ३·५४ कोटी रुपये ( ९·०९% ) गुंतविले होते, इतर कंपन्यांची गुंतवणूक ९·२३ कोटी रु. ( ९·२३% ) होती आणि इतर भागदारांचा वांटा १·४४ कोटी रु. ( ३·७१% ) होता.

### १०० कायद्यांचीं हिंदी भाषांतरें तयार

मध्यवर्ती सरकारनें आतांपर्यंत १०० सरकारी कायद्यांचें हिंदी भाषांतर छापून प्रसिद्ध केलें आहे. मूळ इंग्रजी व त्याचें हिंदी भाषांतर शेजारीं शेजारीं दिलेलें आहे. भारताची राज्यघटना, इंडियन पीनल कोड, पोलीस ॲक्ट, इंडियन एव्हिडन्स ॲक्ट, इत्यादींचा त्यांत समावेश आहे.

### निर्यात वाढविण्यासाठी अमेरिकेची मदत

भारताची निर्यात वाढविण्यास अमेरिकन सरकारनें डॉलर्स व रुपयांच्या चलनांत २५ लाख रुपयांची रक्कम देणगी म्हणून दिली आहे. एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात वाढविण्यासंबंधींच्या भारताच्या मंडळाशीं अमेरिकेचे पांच औद्योगिक व व्यापारी प्रतिनिधि सहकार्य करणार आहेत. हे प्रतिनिधि आपआपल्या विषयांतील तज्ज्ञ असून ते आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडून पाठविण्यांत येतील. भारताच्या एंजिनिअरिंगच्या मालाच्या निर्यातींत अलीकडे बरीच वाढ झालेली आहे. परंतु जागतिक बाजारपेठेंत मालाची विक्री अधिक सुधारण्याच्या दृष्टीनें काय करतां येईल ह्यासंबंधीं अमेरिकन तज्ज्ञ सल्ला देणार आहेत. परदेशीय चलनाच्या प्राप्तींत वाढ करण्याच्या दृष्टीनें एंजिनिअरिंगच्या मालाच्या निर्यातीला त्यांच्या सल्ल्याचा चांगला उपयोग होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

### तेल शुद्ध करण्याचे आणखी दोन कारखाने

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत हिंदमधील तेल-शुद्धीच्या कारखान्यांत आणखी दोन नव्या कारखान्यांची भर घालण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. कलकत्ता आणि मद्रास ह्या किनाऱ्याजवळील शहरांच्या परिसरांत नवे कारखाने काढण्यांत येणार असून त्याशिवाय कोचीन येथील कारखान्यांची तेलशुद्धीची क्षमता वाढविण्यांत येणार आहे. कलकत्ता येथील कारखान्यांत २५ लाख टन तेल शुद्ध करण्याची सोय करण्यांत येणार असून मद्रासमधील कारखान्यांत २० लाख टन तेल शुद्ध करण्यांत येणार आहे. कोचीनमधील कारखान्याचा विस्तार करून जादा १० लाख टन तेल शुद्ध करण्याची व्यवस्था करण्यांत येईल. हा सर्व कार्यक्रम पार पडला म्हणजे चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दरसाल सध्यांपेक्षा ५५ लाख टन अधिक तेल शुद्ध करण्यांत येऊं लागेल. कलकत्ता येथें उभारण्यांत यावयाच्या कारखान्याच्या कामीं गल्फ ह्या अमेरिकन कंपनीनें आस्था दाखविली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत अशुद्ध तेलापासून तयार करण्यांत येणाऱ्या प्रमुख मालाची मागणी २.७ कोटी टनांची असेल असा अंदाज करण्यांत आला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ह्या प्रकारच्या कामाचें उत्पादन १.६ कोटी टनाच्या आसपास असेल असें मानण्यांत येत आहे. बरोनी, कोयाली व कोचीन येथील कारखान्यांचें संभाव्य उत्पादन जमेस धरून हा अंदाज करण्यांत आला आहे. तो खरा ठरला तरीसुद्धां चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मागणी व पुरवठ्यामधील तफावत भरून काढण्यासाठी जादा उत्पादनाची सोय करावी लागेल. बर्मा शेल आणि एसो ह्या कंपन्यांनीं ह्या बाबतींत देऊं केलेलें सहकार्य स्वीकारावें असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. परंतु नैसर्गिक वायु आणि तेल-मंडळीच्या मतानें गंगेच्या खोऱ्यांत करण्यांत येणारा तेलाचा शोध पुरा झाल्यावर मग काय तो निर्णय घेण्यांत यावा.

### औद्योगीकरणासाठी बँकांना सल्ला

गोव्यांत वॉस्को द गामा येथें युनायटेड कमर्शिअल बँकेच्या शाखेचें उद्घाटन हिंदच्या अर्थखात्याच्या उपमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा ह्यांच्या हस्तें करण्यांत आलें. ह्या प्रसंगीं बोलतांना त्या म्हणाल्या कीं, बँकांनीं आपली संघटना स्थापून आपल्या साधनसंपत्तीची सुसूत्रता घडवून आणावी व औद्योगिक विकासाच्या कामीं साह्य करावें. बँकेंत काम करणाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी एक संस्थाहि काढण्यांत यावी. हिंदमधील बँकिंगचा व्यवसाय हा फार सावधगिरीनें चालविण्यांत येतो. पण यशस्वी धंदेवाईक कल्पकतेनें, चतुराईनें आणि पुढाकार घेण्याच्या वृत्तीनें जोखीम पत्करतात. कांहीं बँका गुंडाळाव्या लागल्या असल्या तरी त्या जोखीम अंगावर घेतल्यानें अयशस्वी झाल्या, असें नाहीं. हेतुपूर्वक चुका करण्यांत आल्यामुळें त्या अयशस्वी झाल्या.

### महागाईची वाटचाल

भारतांतील मालाच्या घाऊक किमतींच्या निर्देशांकांत (मूळ प्रमाण मार्च १९५३ ला संपलेल्या वर्षाचा निर्देशांक १०० धरून ) ६ जुलै १९६३ रोजीं संपलेल्या आठवड्यांत त्यामागील आठवड्याच्या १३६.० या निर्देशांकाशीं तुलना करतां, ०.४ टक्क्यानें वाढ होऊन तो १३५.६ वर गेला. गेल्या महिन्याच्या व मागील वर्षाच्या याच आठवड्यांच्या निर्देशांकाशीं तुलना करतां तो अनुक्रमें १.७ व ५.५ टक्क्यानें अधिक आहे.

### गुन्ह्यांच्या संख्येंत वाढ झाली

मध्यवर्ती सरकारच्या गृहखात्यानें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांप्रमाणें १९६१ सालीं कानपूर शहरांतील गुन्ह्यांच्या संख्येंत वाढ झाली. ह्या पूर्वीच्या तीन वर्षांत झालेल्या गुन्ह्यांची जितकी सरासरी होती तिच्या दुपटीनें ही वाढ झालेली आढळून आली. ह्याच कालखंडांत मुंबई व अहमदाबाद शहरांतील गुन्ह्यांत अनुक्रमें १३.८२ टक्के व १४.८८ टक्के वाढ झाली. कानपूरमधील वाढ टक्केवारीच्या हिशेबांत ९२ टक्के झाली. मद्रास व हैद्राबाद शहरांतील गुन्ह्यांची संख्या मात्र घटलेली आढळली. १९६१ सालीं भारतांत दर लाख लोकांच्या मागें १४३ गुन्हे असें प्रमाण होतें. त्यापूर्वीच्या तीन वर्षांत हेंच प्रमाण सरासरी १४५ गुन्हे असें होतें.

### दि बेळगांव बँकेची मुधोळ व हुबळी शाखा

दि बेळगांव बँक लि., बेळगांव च्या मुधोळ कचेरीचें उद्घाटन बुधवार, दि. ३१ जुलै १९६३ रोजीं मुधोळ ( जिल्हा विजापूर, म्हैसूर राज्य ) येथील जुन्या राजवाड्यांत मुधोळच्या राजमाता श्रीमंत पार्वतीदेवी घोरपडे ह्यांच्या हस्तें झालें.

बेळगांव बँकेची हुबळी शाखा स्टेशनरोड येथें गुरुवार दि. १५ ऑगस्ट १९६३ रोजीं सुरू होणार आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
| --- | --- |
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५ २५६२१४ | तारेचा पत्ता : फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
| --- | --- |
| भरपाई झालेलें भांडवल ... | ४ कोटी ५६ लाख |
| गंगाजळी व फंड ... | १ कोटी २६ लाख |
| ठेवी ... | ३० कोटी १३ लाख |
| खेळतें भांडवल ... | ६५ कोटी ६१ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.